सत्यमेव जयते

राज्य निवडणूक आयोग

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ /मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का.०५,
नवीन प्रशासन भवन, पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १९.११.२०११.

निवडणूक तात्काळ
फॅक्स/ई-मेल

प्रति,

१. जिल्हाधिकारी,(सर्व),
(मुंबई व मुंबई उपनगर वगळून)

२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

**विषय :- मतदाराच्या बोटाला लावावयाच्या न मिटणा-या शाईच्या बाटलीऐवजी मार्करपेनच्या वापराबाबत.**

महोदय,

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांमध्ये मतदाराच्या हाताच्या बोटाला लावण्यात येणा-या शाईऐवजी आता मार्करपेनचा वापर करावयाचा असून सदरहू मार्करपेन वापरताना कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. मतदाराच्या हाताच्या बोटाला (पृ.क्र.२/प.वि.वरील छायाचित्रात दर्शविल्याप्रमाणे) मार्करपेनने निशाणी करण्यात यावी. मतदाराच्या बोटाला मार्करपेनने निशाणी केल्यानंतर, मतदाराने मतदान केल्यानंतर त्याच्या बोटास केलेली निशाणी तशीच आहे याची खात्री मतदान अधिका-याने, मतदार मतदान केंद्र सोडण्यापूर्वी करावी.

२. मार्करपेन दाबून वापरावा.

३. मार्करपेन वापरात नसेल तेव्हा त्यास घट्ट टोपण लावून ठेवावे.

४. मार्करपेन वापरात नसेल तेव्हा आडवा (**Horizontal**) ठेवण्यात यावा.

२/-

निवडणूक निर्णय अधिका-यांनी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना निवडणुकीचे प्रशिक्षण देताना मार्कर पेनचा वापर कसा करावा याबाबत पूर्वपृष्ठावर नमूद केल्यानुसार स्पष्ट सूचना द्याव्यात. (सूचना मार्कर पेनवरही दर्शविण्यात आल्या आहेत.)

आदेशानुसार,

आपला

(ध.मा.कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग



अ.शा.पत्र क्रमांक- रानिआ/ मनपा/२०११/प्र.क्र. १०/का.५

निवडणूक प्राथम्य

**ध. मा. कानेड**
अवर सचिव

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दिनांक - २८/११/२०११

विषय :- मतदाराच्या बोटाला लावावयाच्या न मिटणाऱ्या शाईच्या बाटलीऐवजी मार्कर पेनच्या वापराबाबत..

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.१९/११/२०११ चे पत्र.

आदरणीय महोदय,

संदर्भाधिन पत्रान्वये देण्यात आलेल्या सूचनांमध्ये अ.क्र. २ येथे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराच्या बोटाला मार्कर पेनद्वारे शाई लावतांना मार्कर पेन दाबून वापरावा अशा सूचना देण्यात आल्या आहेत. या संदर्भात अजून अशा सूचना देण्यात येत आहेत की, शाई मतदाराच्या बोटावर ठळकपणे उमटेल अशाप्रकारे लावण्यात यावी. याकरिता मतदाराच्या बोटावर मार्कर पेन किमान ३ ते ४ वेळा घासून शाई लावण्यात यावी. याबाबत लेखी सूचना सर्व मतदान केंद्राध्यक्ष यांना स्पष्टपणे द्याव्यात तसेच प्रशिक्षणाच्यावेळी याबाबत प्रात्यक्षिक करुन दाखविण्यात यावे.

स्नेहादराने,

आपला

(ध. मा. कानेड)

जिल्हाधिकारी, सर्व ( मुंबई शहर, उपनगर व ठाणे वगळून)

D:\D.S\Marker pen doc\marate